क्रमांक : **९७९२** /ई-१ कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई-४०००३२
दिनांक : २८ जून, २०२१

**:: परिपत्रक ::**

विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२१ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित स्वीकृत प्रश्न व्यपगत करण्याबाबत.

संदर्भ : (१) संसदीय कार्य विभागाचे पत्र क्र. विमंअ-०२२१/प्र.क्र.४४/पाच, दिनांक ०९ एप्रिल, २०२१.
(२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ८७०१/ई-१, दिनांक ०८ जून,२०२१

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, संसदीय कार्य विभागाच्या या पूर्वीच्या दिनदर्शिकेनुसार मा.मंत्र्यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता नेमून देण्यात आलेले दिवस तसेच त्या दिनांकास निश्चित केलेल्या तारांकित प्रश्नांच्या उत्तराच्या प्रती या सचिवालयास मिळण्याचा अंतिम दिनांक याबाबतची माहिती उपरोक्त संदर्भ क्रमांक (२) च्या परिपत्रकाद्वारे सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात आले होते.

**तथापि, मंगळवार, दिनांक २२ जून, २०२१ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे आगामी द्वितीय (पावसाळी) अधिवेशन हे आता सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१ व मंगळवार, दिनांक ६ जुलै, २०२१ असे दोन दिवस होणार असल्याने सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१ ते गुरुवार, दिनांक १५ जुलै, २०२१ या कालावधीकरिता यापूर्वीच विभागाकडे पाठविण्यात आलेले सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न तसेच वस्तुस्थितीसाठी पाठविण्यात आलेले प्रश्न व्यपगत करण्यात आले आहेत.**

**( पूनम ढगे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२) मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित

C:\Users\eLMLSDOM\Desktop\दुसरे (पावसाळी) अधिवेशन २०२१\परिपत्रक विभाग.doc